## महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, अकोला

### पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीची सूचना

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव (महाराष्ट्र) यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या "कुऱ्हा वढोदा इस्लामपूर उपसा सिंचन योजना" या नियोजित उपसा सिंचन प्रकल्प रायगाव, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव (उपसा), साठवण तलाव, इस्लामपूर तालुका जळगाव (जामोद) जि. बुलढाणा येथे उभारण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे मंजुरी करीता प्राप्त झालेला आहे. सदरील प्रस्तावासंबंधी बुलढाणा जिल्ह्यातील क्षेत्रासाठी पर्यावरण विषयक सूचना, विचार, टिका, टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन करण्यात येत आहे.

**जनसुनावणीचे ठिकाण :- प्रकल्प स्थळ, कन्स्ट्रक्शन कॅम्प, इस्लामपुर धरण (डॅम) जवळ, गाव इस्लामपूर, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा.**

**जनसुनावणी तारीख :- ३०/११/२०२३**

**जनसुनावणीची वेळ :- दुपारी १२:३० वाजता.**

सदर प्रकल्पाच्या परिसरातील रहीवासी, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवासी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सदर प्रकल्पासंबंधी सूचना, विचार, टिका, टिप्पणी तसेच आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येतील. सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना, विचार, टिका टिप्पणी तसेच आक्षेप ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात.

**उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
**आळशी प्लॉट, हुतात्मा स्मारकाच्या समोर,**
**नेहरु पार्क चौक, अकोला- ४४४००१**
**फोन नं. ०७२४-२४०२३४४**
**Email- sroakola@mpcb.gov.in**

सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्तावेज अभ्यासु शकतील.

१. पर्यावरण विभाग, नविन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई.
२. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा.
३. सह संचालक (जल प्रदूषण नियंत्रण मंडळ), महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पांइट २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु), मुंबई-४०००२२.
४. प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ सहकार सुरभी, विवेकानंद कॉलनी जवळ, बापटवाडी, अमरावती-४४४६०६.
५. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, हुतात्मा स्मारक समोर, नेहरू पार्क चौक, आळशी प्लॉट, अकोला - ४४४००१.
६. जिल्हा परिषद कार्यालय, बुलढाणा.
७. जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा.
८. उपविभागीय अधिकारी, जळगाव जामोद, मलकापूर, जिल्हा बुलढाणा.
९. तहसील कार्यालय, जळगाव जामोद, नांदुरा, मलकापूर, जिल्हा बुलढाणा.
१०. नगरपंचायत, संग्रामपुर, ता. संग्रामपुर, जिल्हा बुलढाणा.
११. गट ग्रामपंचायत, वडगांवगड ता. जळगाव जामोद, जिल्हा बुलढाणा.
१२. ग्रामपंचायत, असलगाव, धानोरा, नाव (खुर्द), पळशी सुपो, रसलपुर, खेर्डा खुर्द व सुनगाव ता. जळगाव जामोद, जिल्हा बुलढाणा.

स्वा/-
**उप-प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि.मंडळ, अकोला**
**तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी.**